मासिक सत्यशोधक प्रतिशब्द जानेवारी २०२२



यांचे काय चुकले ? मुस्लिमांना बेदखल करताच येणार नाही.

संपादक

देश-प्रदेश

- **त्रिपुरा :हिंसाचाराच्या आगीमागचे सत्य**

  सचिन गरुड

विशेष परिसंवाद : सुधाकर गायकवाड-रणजित परदेशी : जातीअंताच्या सैद्धांतिक चिंतनाचा वेध

- **बाबासाहेब आंबेडकर यांची दु:ख,भौतिकवाद आणि बदलासंदर्भात भूमिका**

  सतिश बनसोडे

- **दलित चळवळीचा व्यवहार: फुले-आंबेडकरी आकलन**

  विजय माकणीकर

atishabd.com

दलित चळवळीचा व्यवहार: फुले-आंबेडकरी आकलन

विजय माकणीकर

राष्ट्रीय अपराध रेकॉर्ड ब्यूरोच्या अहवालानुसार सन २०१८ ते २०२० पर्यंतच्या आकडेवारीनुसार[1] नुसार संपूर्ण भारतभर अनुसूचीत जाती समूहातील लोकांविरोधातील नोंदणीकृत अपराधांचा आलेख

दलित चळवळीचा व्यवहार: फुले-आंबेडकरी आकलन

विजय माकणीकर

Share Tweet Share Share

राष्ट्रीय अपराध रेकॉर्ड ब्यूरोच्या अहवालानुसार सन २०१८ ते २०२० पर्यंतच्या आकडेवारीनुसार[1] नुसार संपूर्ण भारतभर अनुसूचीत जाती समूहातील लोकांविरोधातील नोंदणीकृत अपराधांचा आलेख चढत्या क्रमाचा दिसून येतो. दुसरीकडे 'लव जिहाद' नामक काल्पनिक (वर्ण-जाती संकराच्या) भयातून धर्मांतर विरोधी कायदे पारित करण्याचा धडाकाही विविध राज्यात मागील काही वर्षांत नित्याचा बनला आहे.[2] भारतात धार्मिक दंगलींना काही पक्षांनी आपला राजकीय कार्यक्रम बनविला आहे असे शरद पाटील निरीक्षण मांडतात.[3] धर्मांधता भारतीय समाजाचा स्थायीभाव बनत चालला आहे अशी शंका काही अभ्यासक व्यक्त करीत आहेत.[4] कांही वर्षांपूर्वी एका इंग्रजी वृत्तपत्रात आपल्या समलिंगी मुलाच्या विवाहासाठी स्वजातीतील नवऱ्या मुलाचा (पती-जोडीदाराचा) शोध घेणारी जाहिरात प्रकाशीत झाल्यावर मोठा गदारोळ झाला होता.[5] या वानगी दाखल उदाहरणातून भारतील मूळ समस्येकडे चटकन लक्ष वेधले जाते. ती समस्या म्हणजे जातीव्यवस्था आणि धर्मसंस्था तसेच यातील परस्पर संबंध. फुले-आंबेडकरांच्या चळवळीची दिशा या विरोधात संघर्ष करण्याची राहिली आहे.

आधुनिक भारताच्या आंबेडकरोत्तर इतिहासातील जाती निर्मूलनाचा अजेंडा असलेल्या दलित चळवळीने यासंदर्भात प्रखर लढा देत नवसमाजनिर्मितीचा ध्यास घेतल्याचे दिसून येते. पर्यायाने धर्म चिकित्सा हा दलित चळवळीचा स्थायीभाव बनला आहे तर या दलित चळवळीची प्रेरणा प्रामुख्याने फुले-आंबेडकर विचारांची असल्याने दलित चळवळीचा फुले-आंबेडकरी विचार हा प्राणवायू ठरलेला आहे असे म्हणण्यात अडचण दिसत नाही. म्हणूनच भारतातील दलित चळवळीला फुले-आंबेडकरी चळवळ असे संबोधन योग्य ठरते. या अनुषंगाने सदरील शोध निबंध दलित चळवळीचा व्यवहार फुले-आंबेडकरी दृष्टिकोनातून तपासण्याचा प्रयत्न आहे.

आज पर्यंतच्या इतिहासात मानवी हक्काचे संरक्षण हा गहन चिंतनाचा मुद्दा राहिला आहे. भारताचा इतिहास त्यास अपवाद नाही. मानवी हक्क संरक्षण त्या त्या समाजातील राजकीय व्यवस्थेशी थेट संबंधीत असते. डॉ. आंबेडकर असे म्हणतात की, समाज रचनेवर राजकीय रचना उभी असते. या तर्का आधारे भारतातील मानवी हक्काचा प्रश्न येथील समाज व्यवस्थेशी निगडीत आहे असे स्पष्ट होते. मग प्रश्न उभा ठाकतो की भारतीय समाजाचे चरित्र नेमके कोणते?

भारताच्या संदर्भात सामाजिक रचनेचा आधार रक्त संबंध आणि धर्मसंस्था आहेत असे विश्लेषण सुधाकर गायकवाड करतात. रक्त संबंध जातीव्यवस्थेकडे अंगुलीनिर्देश करतात. डॉ. आंबेडकरांची तत्व सूत्रे मांडताना सुधाकर गायकवाड सत्तेचे स्त्रोत म्हणून धर्म, सामाजिक प्रतिष्ठा, मालमत्ता यांचा उल्लेख करतात. धर्म हा जात पाळण्यास बाध्य करताना जातीस पावित्र्य, नैतिकता, वैधता प्रदान करतो हे डॉ. आंबेडकरांचे विश्लेषण अधोरेखित करतात. ते पुढे असेही मांडतात की सत्तेचा उगम धर्म, अर्थ आणि सामाजिक प्रतिष्ठा यातून होतो. सत्तेच्या माध्यमातून दुसऱ्या व्यक्तीचे स्वातंत्र्य नियंत्रित होते व त्याकडून स्वहितविरोधी वर्तन घडवून आणणे शक्य होते. वर्णव्यवस्थेचे विकृत रुप जातिसंस्था अस्पृश्य वर्गाला हिंदू तर मानते परंतु वर्णव्यवस्थेबाहेर 'अवर्ण जातीवर्गात' लोटते.[6] व्यवस्थेच्या अगदी तळाला अस्पृश्य जाती समूह भीषण गुलामीच्या चक्रात अडकून पडला आहे. तो खऱ्या अर्थाने भारतातील सर्वहारा ठरतो. असे असले तरी जाती व्यवस्थेने सर्वच जातींच्या हजारो पिढ्यांची सृजनक्षमता, उत्पादकता गर्भातच मारून टाकली आहे असे डॉ. आंबेडकर वारंवार सांगतात.[7] उतरंडीच्या तळाशी असलेल्या जाती व स्त्रियांना उच्चवर्ण जाती आपला हक्काचा वेठबिगारीसम सेवक वर्ग म्हणून राबवितात. तो एका अर्थाने स्वहितार्थ स्त्रिया तसेच अवर्ण जातींवर सत्ता गाजवतो. जातीरुपातील सत्तेला धर्म मान्यता व पावित्र्य बहाल करतो आणि जातिरचनेच्या विषम उतरंडीला वैधानिक बनवतो. धर्माने निर्मिलेली मूल्य व्यवस्था व विचारसरणी जातीचे पालन घडवून आणते व विषमताधारीत गुलामी, दु:ख आणि शोषण चिरंतन बनवते. डॉ. आंबेडकर यांच्या मते भारतीय समाज व्यवस्थेची रचना ही जाणीवपूर्वक अलोकतांत्रिक ठेवली गेलेली आहे. ती समाजाची वर्ण आणि जातींमध्ये विभागणी करते. त्याच बरोबर जाती आणि जात-बहिष्कृत हे सिद्धांत नसून ते आदेश (decree) आहेत. ते लोकशाहीच्या विरोधात उभे केलेले बॅरिकेड्स होत.[8] या समग्र व्यवस्थेने माणसाचे माणूसपण हिराऊन घेतले आहे. मग असे असूनही भारतीय लोक जात का पाळतात? डॉ. आंबेडकर स्पष्ट करतात की भारतीय लोक जात पाळतात कारण त्यांना धर्म तसे करण्यास सांगतो. डॉ. आंबेडकर यामागचे कारण स्पष्ट करताना मांडतात की "लोकांचे वर्तन हा केवळ धर्मशास्त्रांनी त्यांच्या मनावर ठसविलेल्या श्रद्धांचा परिणाम आहे."[9] म्हणूनच डॉ. आंबेडकर या मतापर्यंत

येऊन पोहचले होते की "जातीव्यवस्था ज्यावर उभी आहे त्या धार्मिक जाणिवांचा समूळ विनाश केल्याशिवाय जाती निर्मूलन शक्य नाही."[10] ***लता सिंग वि. उत्तर प्रदेश आणि अन्य***[11] (२००६) या खटल्यात आंतरजातीय विवाहाचे समर्थन करताना मा. सर्वोच्च न्यायालयाने असे मत मांडले की, " जातीव्यवस्था देशावरील शाप आहे, ती जितक्या लवकर नष्ट होईल तितके चांगले होईल." ती नष्ट कशी करावी याची नेमकी तत्वज्ञानात्मक उपाययोजना डॉ. आंबेडकरांकडे होती. धर्मशास्त्रांच्या पावित्र्यावरचा विश्वास ध्वस्त करणे हा जाती निर्मूलनाचा राजमार्ग आहे या निष्कर्षाप्रत डॉ. आंबेडकर येतात हे स्पष्ट होते. जातीविध्वंसाचा अर्थ ते जात जाणिवांमध्ये बदल असा घेतात. यासाठी धर्माचा विनाश कसा आवश्यक आहे ते पटवून देतात. अशाप्रकारे डॉ. आंबेडकर धर्मसंस्थेच्या विरोधात ठोस आणि स्पष्ट भूमिका घेतात. म्हणूनच फुले-आंबेडकरी विचारधारेचे / चळवळीचे आणि धम्मक्रांतीचे भाष्यकार राजा ढाले[12] असे विश्लेषण करतात की डॉ. आंबेडकर यांचा विचार हा 'धर्म आणि धार्मिक शोषण' हे केंद्रस्थानी मानून केलेला विचार आहे. जेंव्हा समग्र राजकीय परिवर्तनाचा विषय येतो तेंव्हा विषमतावादी सामाजिक व धार्मिक शक्तींचा प्रभाव निरस्त आवश्यक ठरते. म्हणूनच राजकीय क्रांतीची पूर्व अट सामाजिक आणि धार्मिक क्रांत्या होत असेही बाबासाहेब मांडतात. दलितांच्याच नव्हे तर संपूर्ण प्रागतिक चळवळीची दिशा नेमकी कोणती असावी याचेही स्पष्ट दिग्दर्शन डॉ. आंबेडकर करतात.

सुसंघटीत राजकीय समाजात कायदाव्यवस्थेला सामाजिक नियंत्रणांचे प्रभावी साधन मानले जाते. असे असले तरी मध्ययुगीन मानसिकतेच्या समाजात विपरीत परिस्थिती असते. ज्यात कर्मठ रुढी परंपरा कायद्याच्या रुपात जनमानसावर प्रभाव गाजवतात. ऐतिहासिक न्यायशास्त्राची विचारधारा[13] असे मानते की विशिष्ट समाजातील कायदे तेथील लोकांच्या सामान्य जाणिवेतून/चेतनेतून प्रसवतात. वर्ण जातिव्यवस्थेच्या समर्थक धर्माज्ञांनी भारतीय समाजातील जाणीव- नेणिवेचे विषमतावादी भरण पोषण केले आहे. याचे प्रतिबिंब पारंपरिक कायद्यात दिसते. यानुसार कायद्याचे राज्य – ज्यात कायद्यापुढे समता आणि कायद्याचे समान संरक्षण- हे तत्व अनुपस्थित असते. यात विषमतेला पावित्र्य, वैधानिकता, राजमान्यता प्राप्त होते ती धर्म संस्थेच्या भक्कम पाठबळाने! म्हणून अशी विषम कायदे व्यवस्था हजारो वर्षांपासून आजतागायत टिकून आहे. समाजशास्त्रीय न्यायशास्त्राची विचारधारा असे मानते की कायदा ही मूलत: आणि केवळ एक सामाजिक वस्तुस्थिती आहे. भारतीय समाजातील जातीव्यवस्थेच्या धर्माज्ञांचा कायदा ही सुद्धा एक सामाजिक वस्तुस्थिती आहे. राज्यघटनेचा अंमल सुरु होऊन सात दशके लोटल्यानंतर सुद्धा जात-धर्माचे प्राबल्य या सामाजिक वस्तुस्थितीला अधोरेखित करते. डॉ. आंबेडकर असेही मानीत की, राजकीय संविधानावर सामाजिक व धार्मिक प्रश्नांचा प्रभाव पडत असतो. राजकीय संविधानाने समाजिक संरचनेची दखल घेतली पाहिजे.[14] दलित चळवळींनीही समाजिक संरचनेची योग्य दखल घेणे अपेक्षित आहे. आंबेडकरोत्तर कालखंडातील दलित चळवळींनी नेमके या संदर्भात कसे विचार-वर्तन व्यवहार केला यांचे परीक्षण करणे या शोध निबंधांचे प्रयोजन आहे.

दलित चळवळीचा व्यवहार: फुले-आंबेडकरी दृष्टिक्षेप

आपण डॉ. आंबेडकरांच्या चिंतनातून, मांडणीतून या निष्कर्षाप्रत येतो की, भारतीय समाजाची मूळ समस्या जातिरचनेतून झालेली समाज घडण ही आहे. त्यास धर्म संस्थेने पावित्र्य, नैतिकतेसह वैधानिकता प्रदान केली आहे. ती शोषण शासनाची व्यवस्था आहे. वर्ण व्यवस्थेशी एकरूप झालेल्या जातीच्या उतरंडीत द्विज जाती जन्मानेच सत्ताधारी ठरतात. तर सवर्ण वर्गात प्रवेश प्राप्त असलेल्या शूद्र वर्ण जाती सुद्धा अवर्ण अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातींविरोधात (द्विज जातींपेक्षा तुलनेने कमी) सत्तेचे लाभार्थी आहेत. जातिरुपातील सत्तेला धर्ममान्यता व पावित्र्य बहाल करतो आणि जातिरचनेच्या विषम उतरंडीला वैधानिक बनवतो. धर्माने निर्मिलेली मूल्य व्यवस्था व विचारसरणी जातीचे पालन घडवून आणते व विषमताधारीत गुलामी, दु:ख आणि शोषण चिरंतन बनवते. यामुळे अवर्ण अस्पृश्य मानल्या गेलेल्या जाती सत्ता वर्तुळाच्या परिघाबाहेर कायमस्वरुपी जाणीवपूर्वक ढकलल्या गेल्या आहेत. त्या संपत्ती, उत्पादनाच्या स्त्रोतांपासून वंचित ठेवल्या गेल्या आहेत. सुधाकर गायकवाड[15] यांनी विविध विचारकांनी मांडलेल्या वंचिता या संकल्पनेची समीक्षा केली आहे. ते स्पष्ट करतात की, 'दुसऱ्याकडे आहे पण आपल्याकडे नाही ही जाणीव म्हणजे वंचिता'. ही वंचिता केवळ संपत्ती धारण करण्याचा अधिकार नाकारला गेल्यामुळे नाही तर आत्मसन्मान नाकारल्या गेल्याच्या भावनेतून येते. वंचित असण्याच्या भावनेतून निराशा येते. तिचा अतिरेक होऊन उद्रेक होतो. हा उद्रेक सांविधानिक, शांततेच्या, लोकशाहीच्या मार्गाने व्यक्त होऊ देणे आधुनिक राज्यसंस्थेचे कर्तव्य आहे. म्हणून फक्त वंचित समूहाच्याच नव्हेतर प्रत्येक व्यक्तीच्या सम्यक व न्याय्य इच्छापूर्तीचे समाधान साधने अंतिमत: राज्यपद्धतीवर अवलंबून असते. या कारणाने परिवर्तनाच्या सामाजिक चळवळीस राज्यपद्धतीचा प्रश्न बाजूला सारता येत नाही. समाजघडणीत धर्म रचना, समाज रचना आणि राजकीय रचना परस्परांवर प्रभाव टाकत असतात.[16] डॉ. आंबेडकर पारंपरिक धर्मच नव्हे तर एकूण धर्म संस्थेलाच नाकारतात. पण या नकारानंतर निर्माण होणाऱ्या पोकळी मध्ये माणूस जीवन जगू शकत नाही. त्याला जगण्याची दिशा दाखवणारी पर्यायी जीवनमूल्ये आवश्यक असतात. म्हणून ते समाजरचनेची पर्यायाने जगाची पुनर्रचना करण्यासाठी 'धम्म' संकल्पना मांडतात. राजा ढालेंच्या विश्लेषणात फुले-आंबेडकरी चळवळीच्या केंद्रस्थानी "धम्मक्रांती" आहे अशी मांडणी पुढे येते. या पार्श्वभूमीवर आंबेडकरोत्तर दलित चळवळीचा व्यवहार कसा दिसतो?

डॉ. आंबेडकरांच्या नंतर रिपब्लिकन पक्षाने सर्व वंचित समूहासाठी व्यापक पर्यायी राजकारणाचा मार्ग अवलंबला. सोबतच धम्मक्रांतीने प्रेरित जनसमूहाने स्वत:च्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनात बदल घडवून आणण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. जातीव्यवस्थेचे गढ,

हिंसक अंधाऱ्या गुहा असलेली खेडी सोडा या डॉ. आंबेडकरांच्या आवाहनाचे पालन करीत शहरे गाठली, शिक्षण, नोकऱ्यांद्वारे प्रगतीचा सपाटा लावला. परंतु तरीही बहुसंख्य दलित समाज ग्रामीण भागातच राहिला. प्रस्थापित राजकारणापुढे रिपब्लिकन पक्ष अपेक्षित तग धरू शकला नाही. परिणामत: सवर्ण जातींचे पाठबळ असणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी दलितांच्या प्रगतीत खोडा घालण्याचा प्रयत्न केला. १९६०-७० च्या दशकात ग्रामीण भागातील दलित विरोधी हिंसक अत्याचार, रिपब्लिकन पक्षाने गमावलेली पत याचा उद्रेक प्रथम साहित्यात आणि नंतर दलित पँथरच्या रुपात बघायला मिळाला. दलित पँथरच्या उठावाद्वारे दलित तरुण सामाजिक रचनेत आपले स्थान आणि सत्व शोधू लागला. आंबेडकरी प्रेरणेने चालणारी चळवळ आत्मसन्मानाची चळवळ सुद्धा आहे. अशाप्रकारे समाज रचनेच्या तळाशी असलेल्या समूहाने संपूर्ण समाजरचनेला आव्हान दिले. यामुळे हे आंदोलन केवळ दलित मुक्तीचे न राहता संपूर्ण समाजक्रांतीचे ठरले असे मत सुधाकर गायकवाड मांडतात.[17] आपले ध्येय गाठण्यासाठी साधन कोणते असावे, मूलभूत समस्येचे विश्लेषण करण्याचा विचार / दृष्टिकोन कोणता असावा या ढाले- ढसाळ यांच्यातील वैचारिक द्वंद्वात पँथर बरखास्त झाली. पण त्यानंतर भारतीय दलित पँथरच्या स्थापनेतून दलित चळवळीचे तत्वज्ञान आणि दिशा फुले-आंबेडकरी की मार्क्सवादी हा प्रश्न निकाली निघाला. ती फुले-आंबेडकरीच असेल हे निर्विवाद अधोरेखित झाले असे निरीक्षण सुधाकर गायकवाड नोंदवतात.[18] दलित हे संबोधन विचारांपेक्षा विशिष्ट जात वांशिक जनसमुहाचा लढा म्हणून समजातून वैचारिक गोंधळ निर्माण होऊ शकतो. याने जातिनिर्मूलनाचा अजेंडा त्यागला की काय असाही भ्रम निर्माण होऊ शकतो. म्हणून सदरील शोध निबंधात लेखक, दलित चळवळीला फुले-आंबेडकरी चळवळ असे संबोधन असावे असा आग्रह धरतो.

धर्म – समाजरचना, अर्थरचना, राजकीय रचना परस्परांवर प्रभाव टाकत असतात हे आपण पाहिले. सुसंघटीत राजकीय समाजात सांविधानिक लढ्यातून अहिंसेच्या मार्गाने हक्क मिळवावे लागतात. स्वातंत्र्योत्तर काळात जुनाट समाजरचनेसाठी आधुनिक संविधान लागू करण्याचे मोठे आव्हान होते. रिपब्लिकन पक्षाचा प्रयोग म्हणूनच अभिनव होता. महाराष्ट्राप्रमाणेच पंजाब, उत्तर प्रदेशात १९६०-७० च्या दशकात रिपब्लिकन राजकारणाने बऱ्यापैकी प्रभाव टाकला. यामुळे बहुजन समाज पक्षाच्या राजकारणासाठी जमीन तयार झाली. १९६०-७० च्या दशकात जगभरातील परिवर्तन चळवळीचे वारे भारतातील वंचित समूहांना आशा दाखवत होते तर आंबेडकरांचे विचार प्रेरणा देत होते. याचाच परिणाम प्रथम बामसेफ, पुढे डी. एस. फोर. आणि अंतिमत: बहुजन समाज पक्षाच्या रुपाने दिसतो. दलित पँथर प्रमाणे दलित युवक आघाडी सुद्धा फुले-आंबेडकरी विचारांचा प्रभाव असलेली चळवळ होती. यातील नेतृत्व एका बाजूला वैचारिक मांडणीही करीत होते व दुसऱ्या बाजूला प्रत्यक्ष जनतेत राहून जनलढ्याचे नेतृत्वही करीत होते. म्हणून या चळवळीतील सक्रिय कार्यकर्ते **ऑर्गनिक इंटेलेक्चुवल**च ठरतात. संसदीय राजकारणाच्या पटलावर या चळवळींना अपेक्षित प्रभाव जरी टाकता नाही आला तरी प्रस्थापित सत्ताकेंद्रांना निवडणुकांत हादरे देण्याइतपत नक्कीच यश येत गेले.

१९८० च्या दशकात नामांतर आणि रिडल्सच्या लढ्यात वैचारिक नेतृत्व याच फुले-आंबेडकरी चळवळीने केले. तत्कालीन सरंजामी सत्ताधाऱ्यांनी शूद्र ओबीसी जातींना सत्ता वाटपात दूर ठेवले. म्हणून धर्माचे उघड उघड राजकारण करणाऱ्या पक्षांनी त्यांना एका बाजूला कॉंग्रेस विरोधात आणि दुसऱ्या बाजूला दलितांविरोधात वापरले असे निरीक्षण सुधाकर गायकवाड मांडतात.[19] आंबेडकरी चळवळीना काटशह देण्यासाठी आणि तथाकथित धर्मांध राजकीय पक्षांच्या विरोधात रिपब्लिकन ऐक्य, कॉंग्रेस सोबत निवडणुकांत युतीचा आग्रह येत गेला असेही ते मांडतात. प्रकाश आंबेडकरांनी भारिप-बहुजन महासंघाच्या प्रयोगातून दलित-वंचित समुहांना सरंजामी कॉंग्रेस च्या प्रभावातून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. परंतु या प्रयत्नांना रिपब्लिकन ऐक्य वा युतीच्या आड विरोध केला गेला असेही निरीक्षण गायकवाड मांडतात. म्हणूनच कदाचित नुकताच शूद्र, अल्पसंख्यक, वंचित जाती समुहांना घेऊन केलेला नवा पर्यायी वंचितचा प्रयोग तथाकथित पुरोगामी, डाव्यांना आवडलेला दिसत नाही. अशा परिस्थितीत फुले-आंबेडकरी चळवळीची समीक्षा ही केवळ "सौदेबाजी" या आरोपाच्या संदर्भातच करण्याचा प्रयत्न डाव्या विचारांच्या प्रभावात असणाऱ्या अभ्यासकांकडून होत असते. दलित चळवळ आपले ऐकत नाही किंवा तीने काय करावे,काय करू नये असे दिग्दर्शन करू इच्छिणाऱ्या अभ्यासक विचारवंतांच्या नेणिवेत दलित पर्यायाने आंबेडकरी चळवळी प्रती कायम आकस दिसून येतो. दुसऱ्या बाजूला आंबेडकरी चळवळीवर डॉ. आंबेडकरांच्या दैवतीकरणाचा, त्यांना वेगवेगळ्या प्रतिमांमध्ये अनुयायांनी कसे बंदिस्त केले असा आरोप अभ्यासक आनंद तेलतुंबडे[20] करतात. परंतु डॉ. आंबेडकरांच्या वेगवेगळ्या प्रतिकांची मांडणी करत नकळत डॉ. आंबेडकरांची "रॅडिकल" प्रतिमा मांडून ते आपल्या विश्लेषणाच्या मर्यादा स्वत: होऊन उघड करतात.

राजा ढाले म्हणतात की डॉ. आंबेडकरांनी जगांची पुनर्रचना करण्यासाठी धम्माचे महत्त्व विषद करून केवळ धर्मच नव्हे तर समूळ धर्म व्यवस्थेची चौकटच नाकारली. म्हणून ते डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील धर्मांतराला "धम्मक्रांती" संबोधतात. शरद् पाटील असा आरोप करतात की, घटना संमत झाल्यानंतर आंबेडकरांनी कायदेमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यावर जात्यंतक लोकशाही क्रांतीचा मार्ग सोडून दिला आणि जात्यंत घटनेवर व नवबौद्ध धम्मावर सोपवला.[21] पण स्वत: मात्र संसदेने जातिनिर्मूलनासाठी आंतरजातीय विवाहाचा कायदा करावा असा आग्रह धरतात.[22] मंडल आयोगाला सर्व प्रस्थापित राजकीय पक्षांचा प्रखर विरोध असूनसुद्धा (फुले-आंबेडकरांच्या प्रेरणेने) दलित चळवळीने मंडल लढ्याचे यशस्वी नेतृत्व केले हे वास्तव नाकारणे चुकीचे ठरेल. आधुनिक भारतातील आदिवासी लढ्यांना आंबेडकरी विचारांनी सुद्धा प्रेरित केले आहे. झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन[23] यांनी नुकतेच विधान केले की

आदिवासी हे कधीही हिंदू नव्हते कारण ते मूलत: निसर्गाची पूजा करतात. यात धर्म नाकारण्याची प्रेरणा कोठून येते हे सांगण्याची आवश्यकता नाही.

कोणत्याही चळवळीची समीक्षा झालीच पाहिजे परंतु ती निरपेक्ष व्हावी. आंबेडकरोत्तर दलित चळवळी या प्रामुख्याने फुले-आंबेडकरी विचारधारेला प्रमाण मानून कालानुरूप स्वत:मध्ये बदल घडवण्याचा प्रयत्न सातत्याने करीत आल्या आहेत. तिच्याकडे निवडणूक प्रधान संसदीय राजकारणाच्या यशापयशाच्या चष्म्यातून बघणे अन्यायकारक ठरेल. तिने आजपर्यंतच्या एकंदर प्रवासात जातिनिर्मूलनाचे आणि जगाच्या पुनर्रचनेसाठीचा धर्मसंस्थेविरोधातील संघर्षसूत्र कधीही त्यागलेलेल नाही. प्रा. गौतमीपुत्र कांबळे यांच्या मांडणीतून हे स्पष्ट होते की माणसाला 'माणूस' बनण्याच्या प्रक्रियेत अडसर ठरणारे, ईश्वरासह अध्यात्मासारखे मानवनिर्मित व काल्पनिक घटक मुळांसह उखडून टाकून, अविवेकी आणि अनैतिक जगाला परास्त करणे, प्रज्ञेवर आधारित नैतिक जगाची निर्मिती करून आधुनिक जगात माणसाचे केवळ 'माणूस' म्हणून अस्तित्व स्थापित करणे हे फुले-आंबेडकरी चळवळीचे ध्येय्य आहे.[24] असे ध्येय्य असणाऱ्या फुले आंबेडकरी चळवळीने आपला अजेंडा कधीही त्यागलेला नाही. या चळवळीने अनेक सक्रिय कार्यकर्ते **ऑर्गनिक इंटेलेक्चुवल** घडविले आहेत. आज कम्युनिस्ट पक्षांना जातिनिर्मूलन विषयक ठोस भूमिका घ्यावी लागत आहे. या आधारे असे म्हणता येते की फुले – आंबेडकरी विचार अपरिहार्यपणे भारतातील सर्वहारांचे तत्त्वज्ञान बनले आहे. सर्व वंचित, दलित समूहाने फुले-आंबेडकरी विचाराच्या इंधनाने भरलेल्या गाडीत प्रवास सुरु केला आहे. ज्या ज्या जात, वर्ग समूहाला नवे जग घडविण्याची इच्छा आहे त्यांच्या समोर ही गाडी उभी आहे. वेळेतच त्यात सवार होणे त्यांच्या हिताचे ठरेल.

---

[1] Crime/Atrocities against Scheduled Caste(s) – 2018-2020, TABLE 7A.1, Crime in India 2020, Vol II, National Crime Records Bureau (Ministry of Home Affairs) Government of India, p. 517, https://ncrb.gov.in/sites/default/files/CII%202020%20Volume%202.pdf.

[2] Like UP law, Karnataka anti-conversion Bill addresses right wing demands on 'love jihad', *Indian Express*, December 22, 2021, https://indianexpress.com/article/cities/bangalore/karnataka-anti-coversion-bill-right-wing-love-jihad-7684737/ (शेवटची भेट २२/१२/२०२१).

[3] शरद पाटील, *जात्यंतक मांडवल दारी लोकशाही क्रांती व तिची समाजवादी पूर्ती*, खंड ३, (सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथम आ. २००३), पा. 239.

[4] सुहास पळशीकर, आपला सार्वजनिक स्वभाव बदलतोय का?, *दै. लोकसत्ता*, डिसेंबर २२, २०२१.

[5] Mother seeks groom for son in first gay matrimonial advertisement, *The Times of India*, May 21, 2015, https://timesofindia.indiatimes.com/city/mumbai/mother-seeks-groom-for-son-in-first-gay-matrimonial-advertisement/articleshow/47363670.cms (शेवटची भेट २२/१२/२०२१).

[6] Dr. B. R. Ambedkar, *DR. BABASAHEB AMBEDKAR: WRITINGS AND SPEECHES*, Vol. 5 (Education Dept. Govt of Maharashtra), p. 112.

[7] म्हणूनच भारतीय संविधानात जात, धर्माच्या आधारे राज्य भेदभाव करणार नाही अशी शाश्वती देते.

[8] Dr. B. R. Ambedkar, *DR. BABASAHEB AMBEDKAR: WRITINGS AND SPEECHES*, Vol. 4 (Dr. Ambedkar Foundation**,** Ministry of Social Justice & Empowerment, Govt. of India, New Delhi, 2014), p. 284.

[9] डॉ. बी. आर. आंबेडकर, *जातीव्यवस्थेचे निर्मूलन* (अनु. प्रा. प्रकाश सिरसट) , (डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, प्रथम आवृत्ती, २०१५) , पा. ५२.

[10] उक्त, पा. १.

[11] (2006) 5 SCC 475.

[12] राजा ढाले, "*एकविसाव्या शतकाच्या संदर्भात फुले-आंबेडकरवादाची मांडणी*", (प्रबुद्ध भारत: डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती विशेषांक-१९९१), पा. ८.

[13] Historical School of Jurisprudence.

[14] डॉ. बी. आर. आंबेडकर, *जातीव्यवस्थेचे निर्मूलन* (अनु. प्रा. प्रकाश सिरसट) , पा. २०.

[15] सुधाकर गायकवाड, माणूस, *त्याचा समाज व बदल : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सिद्धांतन*, (सृजन प्रकाशन, नवी मुंबई, प्रथम आवृत्ती २०१४) , पा. ५५.

[16] उक्त, पा. ३८६-३८९.

[17] उक्त, पा. ४७.

[18] उक्त, पा. ५१-५३.

[19] सुधाकर गायकवाड, *१९८९ चं रिपब्लिकन ऐक्य व विघटन, रिपब्लिकन पक्ष: वास्तव आणि वाटचाल*, संपा. शरणकुमार लिंबाळे, (दिलीप राज प्र. पुणे, २००९), पा. २३३-३४.

[20] आनंद तेलतुंबडे, *डॉ. आंबेडकर प्रतीक, वास्तव व नवा अन्वयार्थ*, क्रांति सिंह नाना पाटील अकादमी, पुणे.

[21] शरद पाटील, उक्त, मलपृष्ठ.

[22] उक्त, पा. १४४.

[23] *The Indian Express*, February 22, 2021, https://indianexpress.com/article/india/adivasis-were-never-hindus-they-never-will-be-jharkhand-cm-7199096/.

[24] गौतमी पुत्र कांबळे, "*फुले-आंबेडकरांना अभिप्रेत असलेल्या जगाच्या निर्मितीसाठी...*", आंबेडकरी साहित्य संसद, कल्याण या संस्थे द्वारे दि. २३ व २४ फेब्रुवारी २००२ रोजी आयोजित फुले-आंबेडकर तिसऱ्या साहित्य संमेलनातील अध्यक्षीय भाषण, (कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती, २०१४), पा. १.

लेखक श्री शिवाजी विधी महाविद्यालय परभणी येथे सहाय्यक प्राध्यापक असून ते फुले-आंबेडकर चळवळीचे अभ्यासक आहेत.

0 comments Sort by **Oldest**

Add a comment...

Facebook Comments Plugin

© 2023 - All Rights Reserved @ Satyashodhak Pratishabd
Website Designed & Developed by iEase IT Solutions